REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 3.8014(UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 6 | MARCH - 2017

# महिला सबलीकरण आणि आर्थिक विकास

प्रा.देशमुख शेषनारायण किसनराव
माऊली महाविद्यालय,वडाळा.

## प्रस्तावना

भारतातील पितृसत्ताक कुटुंबपद्धती, पुरुष प्रधान संस्कृती यामुळे आजच्या प्रगत समाजातही महिला सबलीकरणासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात. भारतीय संस्कृती ही जगातील प्राचीन संस्कृती पैकी एक आहे. या संस्कृतीमध्ये मूल्य, कुटुंबव्यवस्था व स्त्रीचे स्थान महत्त्वपूर्ण आहे.भारतीय संस्कृतीमध्ये स्त्री सन्मान महत्त्वपूर्ण मानला जातो. जेथे स्त्रीचा सन्मान केला जातो. तेथे सौख्य, शांतता राहते. परंतु 20 व्या शतकाच्या पुर्वाधात स्त्रियांना चूल आणि मूल अशी मर्यादा घालून देण्यात आली. त्यामुळे महिलावर्गाची सामाजिक, संस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक प्रगती खुंटलेली दिसते. आपल्या संस्कृतीमध्ये आपण स्त्रीला लक्ष्मी मानतो. परंतु तिच्या हातात कसलीही आर्थिक सत्ता देत नाही. म्हणून सरकारने विविध योजनांच्या माध्यमातून




विशेषतः ग्रामीण भागातील महिला सबलीकरणासाठी प्रयत्न केलेले आहेत. तसेच ग्रामीण भागात बचत गटाच्यामाध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देऊन त्यातून महिला सबलीकरण करणे गरजेचे आहे. त्याशिवाय भारताचा विकास होणार नाही व भारताचे महासत्तेचे स्वप्न पूर्णत्वास जाणार नाही.

## * सबलीकरणाचा अर्थ:-

महिला सबलीकरण म्हणजे महिलांची आर्थिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील सत्ती वाढवून त्यांच्या कल्याणमध्ये वाढ करणे व सकारात्मक दृष्टिकोनातून त्यांना चांगले जीवन जगण्यासाठी सक्षम करणे होय.

## * संशोधनाचे उद्देश :-

1. महिला सबलीकरण धोरणाची सद्यस्थिती जाणून घेणे.
2. महिला सबलीकरणामध्ये आर्थिक विकासाचे महत्त्व तपासणे.
3. महिला सबलीकरणासाठी उपाय सुचवणे.

## * संशोधन पद्धती:-

हे संशोधन दु य्यम तथ्य संकलनावर आधारित आहे. त्यामध्ये विविध संशोधन लेख, पुस्तके, वर्तमानपत्रे, साप्ताहिकातील लेख याचा वापर करण्यात आला आहे.

विकासाच्या रथाला स्त्री व पुरुष ही दोन्ही चाके समान गतीने फिरण्याशिवाय विकासाला योग्य ती गती प्राप्त होणार नाही म्हणून नियोजन पूर्व व नियोजन काळात विविध

कायदे करून तसेच आर्थिक प्रगतीला हातभार लागेल अशा विविध योजना सुरू करून महिला सबलीकरणाचा प्रयत्न सरकारने केलेला आहे.

*** महिला सबलीकरणासाठी व त्याच्या आर्थिक विकासासाठी उपयुक्त ठरलेल्या विविध योजना :-**

1. **महिला आर्थिक विकास महामंडळ** - या मंडळ महामंडळामार्फत महिला बचत गटाला मदत केली जाते त्याचबरोबर महिलांच्या कौशल्य विकास आला मदत होते तसेच महिलांमध्ये व्यवसायिकता काढण्याचा प्रयत्न केला जातो 1975 च्या स्थापनेपासून महिला आर्थिक महामंडळाच्या माध्यमातून महिला सबलीकरण व आर्थिक विकास साधला आहे.

2. **ग्रामीण भागातील महिलांचा व मुलांचा विकास 1982** - ग्रामीण गरीब कुटुंबातील महिलांची आर्थिक स्थिती सुधारणे व त्यातून महिला सबलीकरण करणे तसेच महिला व मुलांच्या आरोग्याची काळजी घेणे यासाठी ही योजना चालू करण्यात आली.

3. **73 वी घटनादुरुस्ती व राखीव जागांचे विधेयक** - घटनादुरुस्तीने पंचायत राज संस्थांमध्ये महिलांना नेतृत्वाची संधी देण्यात आली जिल्हा परिषद,पंचायत समिती,ग्रामपंचायत यामध्ये महिलांना 50 टक्के आरक्षण देण्यात आले. त्यामुळे महिला राजकारणात सक्षम झाल्या त्यांना निर्णय स्वातंत्र्य आले. त्यातून त्यांची आर्थिक निर्णय घेण्याची क्षमता वाढली व महिलांचा विकास होण्यास मदत झाली.

4. **राष्ट्रीय महिला सबलीकरण धोरण 2001** - महिला सशक्तीकरणासाठी सरकारने त्रिसूत्री योजना स्वीकारली, यात महिलांचे सामाजिक सबलीकरण, आर्थिक सबलीकरण, आणि लिंग न्याय त्यांच्यावर भर देण्यात आला.

**अ सामाजिक सबलीकरण-**

यामध्ये महिलांना प्राथमिक आरोग्य सुविधा व कुटुंब कल्याण ची मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या, तसेच सूक्ष्म पोषण आहार मुलींना मोफत शिक्षण, तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण,विविध औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची निर्मिती इत्यादी गोष्टींच्या माध्यमातून महिला सबलीकरण व त्यातून त्यांचा आर्थिक विकास साधण्याचा सरकारने मोठा प्रयत्न केलेला आहे.

**ब. आर्थिक सबलीकरण** -

यामध्ये स्त्रियांना आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र व स्वयंपूर्ण बनण्यासाठी सरकारने स्वर्णजयंती ग्रामीण रोजगार योजना,स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना,राष्ट्रीय महिला कोष, इत्यादींचा महिलांना थेट लाभ उपलब्ध करून दिला. त्याचबरोबर महिलांना फळबाग, कुकुट पालन, मत्स्यपालन , इत्यादीचा थेट लाभ मिळवून दिला.

**क. लिंग न्याय** -

स्त्रीयांबाबतचे सर्व भेदभाव दूर करण्यासाठी स्त्रियांना सामाजिक,राजकीय,आर्थिक,क्षेत्रामध्ये बरोबरीचा दर्जा देऊन लिंग न्याय प्रस्थापित करण्याचा सरकारने प्रयत्न केला आहे.

**5. राष्ट्रीय महिला कोष:- (RMK) 1993 -** गरीब महिलांना लघु उद्योगासाठी या कोषातून उपलब्ध करून दिली जातात त्याचबरोबर सूक्ष्म वित्त पुरवठा केला जातो. राष्ट्रीय महिला कोशाच्या माध्यमातून महिलांच्या आर्थिक सबलीकरणासाठी उद्योजकतेला प्रोत्साहन देणे, त्याचबरोबर नवीन उद्योगासाठी आर्थिक सहकार्य उपलब्ध करून दिले जाते.

**6. महिला बचत गट डॉक्टर मोहम्मद युनुस यांच्या ग्रामीण बँक व सूक्ष्म वित्त पुरवठा** यातून गरीब व होतकरू महिलांच्या झालेला विकास त्याबद्दल त्यांना 2006 मध्ये नोबेल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांच्याच सूक्ष्म वित्त पुरवठा या संकल्पनेतून भारतात बचत गटांना प्रोत्साहन देण्यात आले.भारतात 90 टक्के बचत गट हे महिलांनी स्थापन केलेले आहेत.बचत करणे हा महिलांचा स्थायीभाव आहे महिलांमध्ये काटकसरीची प्रवृत्ती वाढते,या बचतीतून महिलांचा विकास करता येतो.महिलांना बचत गटांच्या माध्यमातून कमी व्याजदरावर कर्ज उपलब्ध करून दिली जातात व यातून अनेक महिलांनी नेत्रदीपक प्रगती केल्याची अनेक उदाहरणे सांगता येतील.यामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील शाहूवाडी तालुक्यातील मानकरवाडी येथील दूध व्यवसाय तसेच अक्कलकोट तालुक्यातील येथील सॅनिटरी नॅपकिन व्यवसाय,यातून महिलांचे आर्थिक सबलीकरण व आर्थिक विकास झाल्याचे दिसून येते.

**7. 1956 चा वारसा हक्क कायदा -** हा कायदा सुधारणा 2005 मध्ये करण्यात आला या कायद्यानुसार हिंदू मुलगा व मुलगी समान वारस मानण्यात आले यानुसार मुलगी कायमस्वरूपी कुटुंबाची सहयोगी सदस्य राहील यामुळे मुलीला वडिलांच्या संपत्ती मध्ये पूर्ण हक्क मिळाला त्यामुळे मुलीला आर्थिक सबलीकरण व त्यातून विकास करण्यास मदत झाली.

**8. समान वेतन कायदा 1976 -** 1975 हे आंतरराष्ट्रीय स्त्री वर्ष म्हणून घोषित करण्यात आले.त्यासाठी महिलांना विशेष हक्क मिळावे म्हणून महत्वपूर्ण कार्य करण्यात आले,उपरोक्त कायद्यानुसार समान काम - समान वेतन देणे बंधनकारक करण्यात आले.या कायद्यामुळे महिला वर्गामध्ये वेतन संबंधी हक्क माहीत झाले.यामुळे शहरी ग्रामीण भागांमध्ये सुद्धा याची अंमलबजावणी काटेकोरपणे होऊ लागली,यातून महिलांची आर्थिक स्थिती सुधारली व महिला विकास विशेषता ग्रामीण भागामध्ये होण्यामध्ये मदत झाली.

**9. ग्रामीण महिला विकास योजना -** महिलांच्या आर्थिक सबलीकरणा शिवाय त्यांचा विकास होणे अशक्य आहे म्हणून त्यांच्या विकासाच्या विविध योजना सरकारने चालू केल्या,या मध्ये महिलांना कौशल्य योजना पुरवणाऱ्या योजना तसेच शेती,पशुपालन व्यवसाय,मत्स्यपालन,दुग्ध उत्पादन इत्यादींसाठी प्रशिक्षण, कर्जपुरवठा सरकारच्या विविध योजना उपलब्ध करून महिलांना आर्थिक सबळ केले जाते व त्यांचा विकास साधला जातो.

**10. कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा -** महिलांना कामाच्या ठिकाणी सुरक्षितपणे व आत्मविश्वासाने काम करता यावे यासाठी 2013 मध्ये हा कायदा करण्यात आला.त्यामुळे महिलांना सुरक्षेची हमी मिळाली.यातून महिलांचे आर्थिक सबलीकरण व्हायला मदत मिळाली व त्यातून महिलांचा विकास झाला.

**11.स्वयंसिद्धा -** स्वयंसहाय्यता गटातील महिलांचा विकास आणि त्यांचे सबलीकरण साधण्यासाठी अमलात आणली जाणारी ही एकात्मिक योजना आहे. याद्वारे सूक्ष्म वित्त पुरवठा केला जातो त्याद्वारे लहान-लहान कर्ज व कमी व्याजदर आकारून विविध उद्योग चालू करण्यासाठी महिलांना प्रोत्साहन दिले जाते. त्यातून महिला सबलीकरण व महिलांचा आर्थिक विकास होण्यास मोठी मदत होते.

**निष्कर्ष -**

सरकारने स्वातंत्र्योत्तर काळात महिला सबलीकरणासाठी व त्यांच्या विकासासाठी अनेक धोरणात्मक योजना व आर्थिक सहकार्य करून महिला सबलीकरणाचे प्रयत्न केलेले आहेत त्यामध्ये नोकरीमधील 33 टक्के आरक्षण तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना 50% आरक्षण असे अनेक काही धोरणात्मक निर्णय वगळता महिला सबलीकरण व विकासासाठी स्त्री पुरुष समानता आर्थिक-राजकीय शैक्षणिक क्षेत्रामध्ये निर्माण करणे आवश्यक आहे म्हणून आजच्या काळात स्त्री पुरुष समानता प्रस्थापित करून पाश्चिमात्य राष्ट्रे प्रमाणे स्त्रियांना मानाचे स्थान बरोबरीचा दर्जा देणे आवश्यक आहे

## महिला सबलीकरणासाठी काही महत्त्वपूर्ण शिफारशी

1 ) महिलांची शिक्षणामधील गळती किमान पातळीपर्यंत आणणे.

2) महिलांना पारंपारिक शिक्षणाबरोबर व्यावसायिक व तांत्रिक शिक्षणाच्या सोयी मध्ये वाढ करणे विशेषता ग्रामीण भागांमध्ये यांचे जाळे वाढवणे.

3) सवलतीच्या व्याजदराने महिलांना कर्जपुरवठा करणे.

4) महिला बँकांचे जाळे निर्माण करणे.

5) महिलांना काही उद्योग राखीव ठेवणे.

6) स्थानिक स्वराज्य संस्था प्रमाणे विविध मंडळांमध्ये महिलांना आरक्षण देणे

7) महिलांना नोकरीमध्ये 50 टक्के पर्यंत आरक्षण वाढवणे महिलांसाठी सामाजिक सुरक्षा योजना मध्ये वाढ करणे.

## सारांश

सरकारने महिला सबलीकरणासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक सामाजिक शैक्षणिक इत्यादी अनेक प्रकारच्या उपाययोजना करून महिलांच्या व आर्थिक विकासासाठी अनेक उपाय केले आहेत सध्या बचत गटाच्या माध्यमातून महिला निर्भिड सुज्ञांनी होत आहेत सरकारने नोकरी शिक्षण राजकीय क्षेत्र तसेच सवलतीच्या दरात वित्तपुरवठा केला तर अनेक बाबतीत महिला महिला सबलीकरण होईल व महिलांच्या विकासाला खऱ्या अर्थाने गती येईल व लवकरच भारत महासत्ता होईल

## संदर्भ


1. युसुफ बेंनूर आणि रेणुका कड स्त्रियांचे संविधानिक हक्क व करार कौशल्य प्रकाशन हुडको औरंगाबाद
2. On the concept of employment- M Mohenty.
3. Government website
4. www.women empowerment in india .

5) भोसले,काटे,दामजी - लोकसंख्याशास्त्र फडके प्रकाशन

6) डॉ.गोटे शुभांगी- महिला सबलीकरण स्वरूप व समस्या.